**<u>लाखनी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी श्री. रा. सु. धडके यांचे न्यायालयात</u>**
**<u>संकिर्णरित्या संपरिक्षा केलेल्या संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. २०१/२०२४ याचा तपशिल</u>**

**<u>निशाणी क्र.</u>**

१. गुन्हा घडल्याचा दिनांक :– ०२/०४/२०२४

२. अहवालाचा/फिर्याद दिनांक :– ०२/०४/२०२४

३. फिर्यादीचे नांव व पत्ता :– महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, लाखनी, ता.लाखनी, जि.भंडारा.

४. आरोपीचे नांव, वय व पत्ता :– **अरविंद डोमा वासनिक,**
वय ४८ वर्षे, व्यवसायः– मजुरी,
रा. राजेगाव (एम.आय.डी.सी.), ता. जि. भंडारा.

५. अपराधाचा तपशील :–

तुम्ही, दिनांक ०२/०४/२०२४ रोजी १९ः१५ वाजताच्या सुमारास मौजा राजेगाव (एम.आय.डी.सी.), ता. जि.भंडारा येथील तुमच्या घराच्या माजघरात ०३ प्लास्टीक डबकींमध्ये अंदाजे ६० लिटर हातभट्टी दारू अवैधरित्या व विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देश्याने बाळगुन असल्याचे मिळून आलात व त्याव्दारे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला, असा तुमच्यावर आरोप ठेवण्यात येते.

अपराधाचा तपशील आरोपीस वाचुन दाखविण्यात आला.

RAHUL SURESH DHADAKE
Digitally signed by RAHUL SURESH DHADAKE
Date: 2025.02.21 18:06:52 +0530

दिनांकः २१/०२/२०२५

(रा. सु. धडके)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, लाखनी.

६. **<u>आरोपीची जबानी</u>**

प्रश्न क्र. १:– तुम्हाला पोलीस चालानच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर :– होय.

प्रश्न क्र. २:– तुमच्यावर ठेवलेला आरोप जो आता तुम्हाला वाचुन दाखविण्यात आला तो तुम्हाला समजला काय?

उत्तर :– होय.

प्रश्न क्र. ३:– तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर :– नाही.

समक्ष

स्वा/–
आरोपीची सही

RAHUL SURESH DHADAKE
Digitally signed by RAHUL SURESH DHADAKE
Date: 2025.02.21 18:07:00 +0530

दिनांकः २१/०२/२०२५

(रा. सु. धडके)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, लाखनी.